# मुंबई विद्यापीठ

हस्तलिखिते कक्ष
परीक्षा विभाग,
क्र. ईएक्स/आयसीडी/२०१६–१७/10.80
22, डिसेंबर २०१६

**परिपत्रक :–**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि: संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे असे सुचित करण्यात येते की, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या श्रीयुत. राजेश अग्रवाल, समितीच्या शिफारशीनुसार परीक्षा विभागात ICT तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०१३ पासून परीक्षांच्या प्रश्नपत्रिका DEPDS प्रणाली द्वारे परीक्षा केंन्द्रावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रथम सत्र २०१६ पासून सर्वच (१००%) परीक्षांच्या प्रश्नपत्रिका Online द्वारे परीक्षा केंन्द्रावर उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

प्रथम सत्र २०१७ करीता online प्रश्नपत्रिका पाठविणेकामी नविन अभिकरणाची नियुक्ती DEPDS करीता झालेली आहे. या अभिकरणाची DEPDS प्रणालीकरीता नवीन पध्दतीची माहिती महाविद्यालयांस होणे आवश्यक आहे.

विद्यापीठामार्फत DEPDS प्रणाली द्वारे परीक्षा केंन्द्रावर प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देते वेळी काही तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका Online द्वारे उपलब्ध करून देतेवेळी काही महाविद्यालयातील साधनसामुग्रीच्या (Computer, Printer, Fax Machine, Scan Machine, Xerox Machine, C.C. T.V.s, Internet, Dongal, I. T. Co-Ordinator etc.) बाबत त्रुटी/अडचणी जाणवतात त्यामुळे प्रश्नपत्रिका Online द्वारे परीक्षा केंन्द्रावर उपलब्ध करून देते वेळी अनेक अडचणीं निर्माण होतात. यास्तव विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व I.T. Co-Ordinator यांना DEPDS पध्दतीबाबत पुर्ण माहिती अवगत करून देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

कार्यशाळेचा तक्ता खालील प्रमाणे :–

| अ. क्र. | कार्यशाळेचे ठिकाण | विभागातील महाविद्यालये | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | गोगटे जोगळेकर महाविद्यालय, ॲड. एन.व्हि. जोशी रोड, जिल्हा कोर्ट जवळ, जि. रत्नागिरी | रत्नागिरी जिल्हा | ०३/०१/२०१७ | ११.०० ते ०१.०० |
| २ | संत राऊळ महाराज महाविद्यालय, एस. एन. देसाई चौक, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | सिंधुदुर्ग जिल्हा | ०४/०१/२०१७ | ११.०० ते ०१.०० |
| ३ | बिर्ला महाविद्यालय, बिर्ला कॉलेज रोड, कल्याण (प) जि. ठाणे | कल्याण ते कर्जत, भिवंडी, शहापूर, मुरबाड | ०५/०१/२०१७ | ०२.३० ते ०४.३० |

...2...

# मुंबई विद्यापीठ



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | सी. के. टी. महाविद्यालय, प्लॉट ०१, सेक्टर ११, खांदा कॉलनी, पनवेल | रायगड जिल्हा | ०६/०१/२०१७ | ११.३० ते ०१.३० |
| ५ | खालसा कॉलेज आर्टस, सायन्स कॉमर्स, एम. पी. पारीख रोड, डॉन बोसको हायस्कुल, माटुंगा | सीएसटी ते सायन | ०९/०१/२०१७ | ११.३० ते ०१.३० |
| | | कुर्ला ते मुलुंड | ०९/०१/२०१७ | ०२.३० ते ०४.३० |
| ६ | के. जे. जोशी कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स, चंदनी बंदर रोड, सीडको बस स्टॉप, ठाणे (प) | ठाणे ते डोंबिवली, नवी मुंबई | १०/०१/२०१७ | ११.३० ते ०१.३० |
| ७ | भास्कर वामन टाकुर कॉलेज ऑफ सायन्स, (विवा कॉलेज) यशंवत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विवा कॉलेज रोड, विरार (प) | दहिसर ते विरार, पालघर, वाडा, मोखाडा, जव्हार, डहाणू, विक्रमगड | ११/०१/२०१७ | ११.३० ते ०१.३० |
| ८ | डि. टी. एस. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स, कुरार व्हिलेज मालाड (पू.) | चर्चगेट ते सांताक्रुझ | १२/०१/२०१७ | ११.३० ते ०१.३० |
| | | विलेपार्ले ते बोरीवली | १२/०१/२०१७ | ०२.३० ते ०४.३० |

**तरी वरील तक्त्यात दर्शविलेल्या परीक्षेत्रातील सर्व विद्यापीठाचे विभाग/संलग्नित महाविद्यालये यांचे विभागप्रमुख/प्राचार्य व I.T. Co-Ordinator यांनी तक्त्यात दर्शविलेल्या ठिकाणी त्या–त्या दिवशी व वेळी कार्यशाळेस उपस्थित रहावे.**

मुंबई – ४०००९८.
दिनांक २१/१२/२०१६

(दिपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि: संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव

प्रत माहितीसाठी:–

१. मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
२. मा. कुलसचिवांचे स्विय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
३. मा. संचालक BCUD चे स्विय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
४. सर्व उपकुलसचिव (परीक्षा भवन)
५. सर्व सहाय्यक कुलसचिव (परीक्षा भवन)